# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 17 January 2025

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १७ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम् इथं भारतातील सर्वात मोठं परिवहन प्रदर्शन, भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ चं उद्घाटन करणार आहेत. सीमांच्या पलीकडे: भविष्यातील ऑटोमोटिव्ह मूल्य साखळी सह-निर्मिती, अशी या प्रदर्शनाची संकल्पना आहे. या एक्स्पोचं उद्दिष्ट संपूर्ण गतिशीलता मूल्य साखळीला एकाच छत्राखाली आणणं हे आहे. या वर्षीच्या प्रदर्शनात जागतिक महत्त्वावर विशेष भर दिला जाईल ज्यामध्ये जगभरातले प्रदर्शक आणि अभ्यागत सहभागी होतील.

****

स्वामित्व योजनेअंतर्गत दहा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या ५० हजार गावांमधल्या ६५ लाख लाभार्थींना प्रॉपर्टी कार्डचं वितरण आज पंतप्रधानांच्या हस्ते दुरस्थ माध्यमातून होणार आहे. ग्रामीण भारताचा आर्थिक विकास आणि गरजूंना हक्कांची घरं उपलब्ध करुन देणं तसंच ड्रोन सर्वेक्षणाद्वारे घरांची नोंद ठेवणं हा प्रधानमंत्र्यांनी सुरू केलेल्या या योजनेचा उद्देश आहे.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय क्रिडा पुरस्कारांचं वितरण होणार आहे. बुद्धिबळपटू डी गुकेश, हॉकीपटू हरमनप्रीत सिंग, पॅरा अॅथलिट प्रवीण कुमार आणि नेमबाज मनु भाकर यांना खेलरत्न पुरस्कार, नेमबाज स्वप्निल कुसळे आणि पॅरा अॅथलिट सचिन खिलारी यांच्यासह ३५ जणांना अर्जुन पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्यांमध्ये सुभाष राणा, दीपाली देशपांडे, संदीप सांगवान यांचा समावेश आहे.

****

७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो उपस्थित राहणार आहेत. २५ आणि २६ जानेवारी रोजी ते भारत दौऱ्यावर येतील.

दरम्यान, प्रजास्ताक दिनाच्या निमित्त हवाई प्रदर्शन दाखवण्यासाठी भारतीय हवाई दल सज्ज आहे. सुमारे ४० विमानं कर्तव्यपथावर विविध कसरतींचं प्रदर्शन करतील. यंदा मिग 29, राफेल, सुखोई 30, जग्वार, अपाचे, C-130 आणि C - 17 यासारखी लढाऊ विमानं सादरीकरणात भाग घेतील. याशिवाय हवाई दलाची एक तुकडी सुद्धा कर्तव्यपथावर प्रदर्शन करेल.

****

राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचा पुढचा हप्ता २६ जानेवारीपर्यंत देण्यात येणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. त्या काल मंत्रालयात वार्ताहरांशी बोलत होत्या.

****

बारामतीमध्ये अत्याधुनिक दर्जाचं पशुवैद्यकीय महाविद्यालय उभारणार असल्याची घोषणा, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. माळेगाव कृषी विज्ञान केंद्रात आयोजित केलेल्या कृषिक २०२५ या आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन करताना ते काल बोलत होते. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर हे या वर्षीच्या प्रदर्शनाचं आकर्षण आहे. उत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीनं शेतकऱ्यांनी ऊस क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, ऊसाच्या नवीन वाणाची लागवड करावी, असं सांगून पवार यांनी, शेतमालाची उत्पादकता वाढवण्यासाठी राज्य आणि केंद्र शासनाकडून सहकार्य मिळेल, असं आश्वासन दिलं.

****

मुदत संपल्यानं राज्यातल्या सहा जिल्हा परिषदा आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या एकूण ४४ पंचायती समित्यांवर प्रशासक नेमण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. या जिल्हा परिषदांमध्ये नागपूर, अकोला, वाशिम, धुळे, नंदुरबार आणि पालघर यांचा समावेश आहे. या सहा जिल्हा परिषदांच्या अंतर्गत येणाऱ्या ४४ पंचायत समित्यांची मुदतही संपल्याने प्रशासक नेमण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी निवडणूक होईपर्यंत प्रशासक म्हणून काम पाहतील.

****

जागतिक हवामान बदल रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचं राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. चंद्रपूर इथं काल हवामान बदल

२०२५ या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांना एकत्र आणण्यासाठी एका ॲप ची निर्मिती करणार असल्याचं परिषदेचे संयोजक सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितलं.

****

चीनसोबतच्या संबंधांमध्ये विश्वासार्हतेचा अभाव ही मोठी समस्या असल्याचं, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य जयदेव रानडे यांनी म्हटलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं विवेकानंद व्याख्यानमालेत चिनी महत्त्वकांक्षा भारतीय आणि जागतिक संदर्भ या विषयावर बोलत होते. या व्याख्यानमालेत आज 'न्याय, न्यायपालिका आणि स्वातंत्र्य' या विषयावर आभा सिंह यांचं व्याख्यान होणार आहे.

****

नाशिक जिल्ह्यातल्या गंगापूर, कडावा कालव्यातली गळती कमी करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत. शेतीसाठी पाण्याचं आवर्तन देतांना जवळपास ६० टक्के पाणी गळतीचं प्रमाण दिसून येत असून, हे प्रमाण २० टक्यांवर आणण्यासाठी जिल्हा प्रशासनानं आणि जलसंपदा विभागानं काटेकोर नियोजन करावं असंही त्यांनी सांगितलं.

****

विश्वचषक खो-खो स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या आणि महिलांच्या संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला असून, आपापल्या गटात दोन्ही संघ अव्वल स्थानावर आहेत.

****